आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**January 2022, Issue-85, Vol-01**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

MISS. VARSHA ANILRAO TIDKE
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr. Wagh Anand**

Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

Ms.Trushna Sudhakar Kalambe
66,Ayodhyanagar behind Sai mandir
Nagpur -440024
Email: trushna.kalambe@gmail.com

- **Prof. Surwade Yogesh**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr.Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**

Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001

13) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व चांभार समाज
डॉ.वाघमारे प्रकाश संभाजी, जि.हिंगोली ||49

14) उत्तुंग व्यक्तिमत्व: डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम
डॉ.शरद पवार, जि.सातारा ||57

15) नंदुरबार तालुक्यातील भिल्ल जमातीचे सामाजीक सांस्कृतिक जीवनदर्शन
डॉ.एम.जी.मोरे, जि.जालना ||61

16) गोंड आदिवासीतील सामाजिक संरचनात्मक बदलाचे अध्ययन
डॉ. बबन पवनदास मेश्राम, गोंदिया ||63

17) महिला व मानवाधिकार
प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे, सिंदखेडराजा ||67

18) गांधीजी को सहयोगी से असहयोगी बनाने वाले तत्व व उनका भारतीय राजनीति ...
डॉ. अजय शंकर यादव, (झाँसी) ||71

19) भारतीय अर्थव्यवस्था की समस्याएं एवं समाधान
डॉ० अनूप कुमार, बरेली ||74

20) आधुनिक हिंदी के स्वच्छंदतावादी कवि प्रोफेसर केसरी कुमार
Dr.Arvinder Singh Arora, Hoshiarpur, Punjab ||79

21) बदलते अन्तर्राष्ट्रीय परिवेश में भारत—नेपाल सम्बन्ध
डॉ. दीर्घपाल सिंह भण्डारी, टिहरी गढ़वाल, (उत्तराखण्ड) ||81

22) आधुनिक समाज में संचार संस्कृति द्वारा सामाजिक परिवर्तन: एक समाजशास्त्रीय ...
कवीन्द्र सिंह बोरा, (ऊधमसिंह नगर) ||87

23) राजेंद्र यादव के उपन्यासों में नारी
डॉ. रत्नमाला धारबा धुळे, जि.हिंगोली ||90

24)The Impact of Covid-19 on Banking Sector in India
Dr. Gorakhnath Eknath Wakle, Nashik, Maharashtra ||93

25) कुइयांजान उपन्यास में वर्णित राजनीतिक परिदृश्य
तेज प्रकाश जोशी, अल्मोड़ा (उत्तराखण्ड) ||100

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

17

# महिला व मानवाधिकार

प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा

**प्रस्तावना:**

जगातील विभिन्न देशात स्त्री-पुरूषांकरीता समान अधिकार मान्य करण्यात आले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्काचा जाहिरनामा स्विकारून आज ७३ वर्ष होत आहेत तरीही आज महिला व त्यांचे अधिकार सुरक्षित आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीय असला तरी संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांनी महिलांचे हक्क व सुरक्षितता याकरीता प्रयत्न केले आहेत. असे असले तरी भारत, मुस्लिम देश व अन्य विकसनशिल देशात स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार नित्याची बाब आहे. इंग्लंड, अमेरिका आणि युरोपातील इतर देशात आजही स्त्रीयांना पुरूषांच्या अत्याचाराला बळी पडावं लागते. आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानवी हक्क चर्चेचा विषय बनला आहे. आजही जगातील अनेक देशात महिलांवर अन्याय होत आहे व अन्याय करणारे निर्दोष सुटत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर मानव अधिकार स्विकृत करूनही त्याची योग्य अंमलबजावणीचा अभाव आहे. मानव अधिकाराचे हनन झाल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची दखल घेवून दोषींविरूध्द कार्यवाही करणारी प्रबल सत्ता नाही, याचाच फायदा विभिन्न देश व तेथील अन्याय करणारे घेतात. पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुध्दात मानवी हक्क, मानवी जीवन आणि प्रतिष्ठा यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाले असे पुन्हा होवू नये या पार्श्वभूमीवर मुलभूत मानवी हक्क, मानवी प्रतिष्ठा आणि व्यक्तीचे मूल्य आणि स्त्री-पुरूष समानता याच्यावरील विश्वास पूनर्प्रस्थापित करण्याकरीता मानवी हक्काचा जाहिरनामा स्विकृत करण्यात आला, याची योग्य अंमलबजावणी करणे सदस्य राष्ट्रांची कर्तव्य ठरते.

**उद्दीष्ट्ये:**

१) मानवी हक्क संरक्षण कायद्याची मुलभूत संकल्पना समजावून घेते.

२) मानवी हक्क संरक्षण कायद्यातील तरतुदीचे विवेचन करणे.

३) मानवी हक्क जपणाऱ्या वैधानिक यंत्रणांची माहिती जाणून घेणे.

४) भारतातील मानवी हक्काचे संरक्षण व अंमलबजावणी करणाऱ्या वैधानिक यंत्रणांची माहितीचे अध्ययन.

५) मानवी हक्काच्या संरक्षण आणि संवर्धनात सुसंस्कृत समाजाची भूमिका.

**महत्त्व:**

अमेरीकेत १९६० साली Women's studies ची सुरूवात झाली. १९७५ नंतर या अध्ययनाला जोरदार चालना मिळाली. एक स्वतंत्र ज्ञान शाखा म्हणून स्त्री अध्ययनाचा विकास होवू लागला. जागतिक स्तरावर झालेल्या अध्ययनातून विकसित राष्ट्रातील स्त्रीया, आशिया खंडातील स्त्रीया व तिसऱ्या जगातील स्त्रीयांच्या दर्जाच्या (Status) तुलनेत भारतीय स्त्रीयांचा दर्जा कसा आहे, याचे अध्ययन या शोधनिबंधात केले आहे. U.N.O. ने मानवी हक्काचा जाहिरनामा स्विकारल्यानंतर अनेक देशांनी त्याची अंमलबजावणी केली. तद्वतच भारताने सुध्दा आपल्या घटनेत स्त्रीयांचा दर्जात वाढ करण्याच्या हेतूने अनेक तरतुदी व त्या अनुषंगाने अनेक कायदे व नियम तयार केले. स्त्रीयांना समान अधिकार, समान संधी, समान शिक्षण, समान आरोग्य, समान सत्ता व समान प्रतिष्ठा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिळते की नाही याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे. मानवी अधिकार व भारतीय स्त्रीयांची प्रतिष्ठा त्याकरीता केलेल्या अंमलबजावणीचा आढावा घेतल्यास पुढील प्रवासाची दिशा यातून मिळेल याकरीता हे संशोधन महत्त्वाचे आहे.

**मानवाधिकार (Human Right):**

Human rights are those rights to which an individual is entitled by virtue of his status as a human being. The scope of human right is very wide. They set the statndards for the provision and expansion of civil, political and social-economic rights.1

मानवाधिकार ही संकल्पना फार जुनी असून याचा जन्मच शोषण आणि अत्याचारातून झाला आहे. मॅग्नाचार्टा हा प्रथम दस्तऐवज होय. १७८९ ची फ्रान्स राज्यक्रांती, बिल ऑफ राईट, इत्यादींनी मानवाधिकाराचा विचार मांडला तरी द्वितीय विश्वयुध्दात मानवाधिकाराचे प्रचंड प्रमाणात उल्लंघन केले. त्यातूनच मानवाधिकाराचा सुरक्षिततेकरीता १० डिसेंबर १९४८ ला मानवाधिकाराचा जाहिरनामा स्विकारला. त्यातील तरतुदी ह्या सदस्य

राष्ट्रांना बंधनकारक राहतील असे नमुद आहे. This declaration contains 30 articles, aparts from its preamble. Its preamble states that the recognition of the inherent dignity and equality of all human beings and their inalienable rights is the foundation of freedom, justice and peace in the world.

मानवाधिकार आयोगाने आपले कार्य जानेवारी १९४७ पासून श्रीमती फ्रँकलीन डी रूझवेल्ट यांच्या अध्यक्षतेत प्रारंभ केला. १० डिसेंबर १९४८ मानवाधिकारी घोषणा संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने केली.

**मानवाधिकार व भारतीय महिलांची प्रतिष्ठाः**

मानवाधिकाराच्या संदर्भात भारतीय महिलांची प्रतिष्ठा याचा आढावा प्राचीन कालखंडापासून घेण संयुक्तीक ठरेल. भारतीय स्त्री प्राचीन काळापासून दुय्यम स्थानी होती असा समज रूढ आहे. परंतु इतिहासातील एक कालखंड निश्चितच स्त्रियांना मानाचे स्थान देणारा होता. वैदीक कालखंडात समाजात स्त्रीची स्थिती समाधानकारक होती. इतर वैदीक कालखंडात म्हणजे मनुस्मृती सारख्या ग्रंथाची रचना होत होती, तेव्हा स्त्रीयांचा दर्जा खालावत चालला होता. बौध्द व जैन धर्माच्या उदयाने स्त्रीयांना समान मानून ज्ञानाची दालने खुली करून दिली. थोडक्यात प्राचीन कालखंडामध्ये स्त्रीच्या दर्जात प्रचंड स्थित्यंतर घडून आले. मुक्तीकडून गुलामीकडे होणारी वाटचाल पुढील काळात जास्त वेगाने झाली. मध्ययुगीन कालखंड हा भारतीय स्त्रीयांच्या जीवनातील अंधकारमय कालखंड आहे. या कालखंडात स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय असे सर्वच हक्क नाकारण्यात आले. स्त्रीजीवन पूर्णतः पुरूषाधीन व परावलंबी होते.

एकोणीसाव्या शतकात भारतीय स्त्रीची प्रतिष्ठा पूर्वीप्रमाणेच होती, फक्त त्यात बदलास सुरूवात झाली होती. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीयांनी व्यावसायीक क्षेत्रात पाऊल टाकले त्याचे फलीत म्हणजे आज शिक्षिका, प्राध्यापिका, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, नर्स इ. विभीन्न क्षेत्रात अनेक स्त्रिया समर्थपणे कार्य करीत आहेत.

**भारतीय संविधान व मानवाधिकारः**

संयुक्त राष्ट्रसंघाने मानवाधिकाराच्या संदर्भात उल्लेखनीय कामगिरी केली. भारतीय संविधानात स्त्रीयांच्या प्रतिष्ठेसंदर्भात अनेक तरतुदी मानवाधिकाराच्या सनदेला अनुसरून करण्यात आल्या. UNO declaration of human rights the International convention of economics, social and cultural rights. The International convention on civil political rights all accepts this principles Article 14 of Constitution of India 15 also.

Regarding the human rights of women, the general Assembly has passed the resolution;

1) Discrimination (employment and occupation) convention general conference of International labour organization 42nd session 25th Jan. 1958

2) Convention again discrimination in education, general conference of UNESCO 14th Dec., 1960.

3) Convention of suppression of the traffic in person, general assembly resolution 317 2nd Dec., 1957.

4) Declaration of protection of women and children in emergency armed conflict.

5) Convention on elimination of all kinds of discrimination against women 1979.

6) Convention on nationality of married women, general assembly resolution 29th Jan., 1957.

The World Conference human rights held on Vienna in 1993 to deliberate the issue of discrimination on the ground of Sex. The world conference held on China 1995 equal rights of women.

**स्त्री प्रतिष्ठा व भारतीय संविधानः**

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार व स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्री प्रतिष्ठेला बाधा येणार नाही असे अनेक नियम बनविण्यात आले.

१) स्वातंत्र्यपूर्व कालखंडः सती प्रथा निषेध अधिनियम (१८२९), बालविवाह विरोधक अधिनियम (१९२९), हिंदू विधवा पूर्नविवाह अधिनियम (१८५६), हिंदू स्त्रियांचा संपत्तीवरील अधिकार नियम (१९३७), विशेष विवाह अधिनियम (१८७२, १९२३, १९५४), हिंदू विवाहीत (वेगळ्या राहील्यास) भरण पोषण अधिकार अधिनियम (१९४६), हिंदू विवाह निर्योग्यता निवारण अधिनियम (१९४६).

२) स्वातंत्र्योत्तर कालखंडः हिंदू विवाह अधिनियम (१९५५), हिंदू उत्तराधिकार अधिनियम (१९५६), हिंदू दत्तक ग्रहण आणि भरण-पोषण अधिनियम (१९५६), स्त्रिया व मुलींचा अनैतिक व्यापार

विरोधक अधिनियम (१९५६), हुंडा प्रतिबंधक अधिनियम (१९६१), चिकित्सा गर्भ समापन अधिनियम (१९७१), कन्या भ्रुण हत्या अधिनियम (१९९४, १९९९, २००३), घरेलू हिंसा अधिनियम (२००५), कारखाना अधिनियम (१९४८), खान अधिनियम (१९८२), मातृत्व लाभ अधिनियम (१९६१), समान वेतन अधिनियम (१९७६) असे सर्व अधिकार स्त्रीयांची सुरक्षितता, प्रगती आणि कल्याणाच्या उद्देशाने बनविण्यात आले. समानता आणि सामाजिक न्याय सिध्दांताला प्राथमिकता देण्यात आली.

भारताच्या पंचवर्षीक योजनेत सुध्दा महिलांच्या प्रतिष्ठेकरीता प्रयत्न करण्यात आले. असे अनेक अधिनियम व विविध योजना बनविण्यात आल्या तरी अनेक समस्या आजही कायम आहेत. स्त्रीयांवरील अत्याचारास आळा बसावा म्हणून बलात्कार विरोधी कायदा, स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन विरोधी कायदा (१९८०), समान कामाला समान वेतन कायदा (१९७४), मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट (१९६१), ठेकेदार मजुर कायदा (१९७८).

भारतीय महिलांची सामाजिक, आर्थिक, राजकीय,वैद्यकीय, शैक्षणिक, कौटूंबीक कायदेविषयक प्रतिष्ठेचा आलेख निश्चितच प्रगती पथावर आहे. आज सामाजिक क्षेत्रात अनेक महिला आपले कर्तुत्व सिध्द करून उच्च प्रतिष्ठा प्राप्त करीत आहेत. यामध्ये मदर तेरेसा, अरूणा रॉय, मेघा पाटकर, इत्यादी महिलांची प्रतिष्ठा जागतीक स्तरावर पोहचली आहे.

राजकीय क्षेत्रात पंचायत राज योजनेत ५० टक्के आरक्षण देवून महिलांची प्रतिष्ठा पुरूषांच्या तुलनेत निर्माण झाली आहे. यामध्ये अनेक महिलांनी सरपंच, सभापती व अध्यक्ष पदाची धुरा समर्थपणे सांभाळत योग्य निर्णय घेतले आहेत. यामध्ये अनेक स्त्रीयांनी कर्तुत्व सिध्द करून स्त्री जातीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. यामध्ये डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी, इंदिरा गांधी, लक्ष्मी मेनन, हंसा मेहता, तारकेश्वरी सिन्हा, विजयाराजे शिंदे, मनेका गांधी, मार्गारेट अल्वा, सुभद्रा जोशी, मृणाला मोरे, डॉ. नजमा हेपतुल्ला, राजकुमारी अमृत कौर, सुचेता कृपलानी, सोनिया गांधी, मायावती, प्रतिभाताई पाटील इत्यादींची प्रतिष्ठा सर्वोच्च स्थानी आहे.

खेळात महिलांनी प्रतिष्ठेचे स्थान मिळविले आहेत. पी.टी. उषा, कुंजराणी देवी, सानिया मिर्झा, मल्लेश्वरी, सायना नेहवाल या भारतीय स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. कला व मनोरंजनाच्या क्षेत्रात अनेक स्त्रीयांनी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. यामध्ये एम.एस. सुब्बालक्ष्मी, लता मंगेशकर, आशा भोसले, ऐश्वर्या रॉय, स्मिता पाटील, साहित्य क्षेत्रात अरूंध्दती रॉय, निता देसाई, शोभा डे, किरण देसाई तर कार्पोरेट क्षेत्रात किरण मुजुमदार (Richest Indian Women a Corporate Queen) M.D. of Biocan India, विद्या मोहन, छाबरीया, नैनालाल किरवानी, Sullaijja Firdia Motwani, Mallika Shriniwasan यांनी भारतीय स्त्रीयेच्या प्रतिष्ठेला उभारी आणली आहे. Kalpana Chawala, Sunita Williams ह्या Universal Queen आहेत यांनी आपली प्रतिष्ठा आकाशाला भिडविली आहे.

शैक्षणिक क्षेत्रात डॉक्टर, इंजिनिअर, व्यवस्थापन संशोधन, तंत्रज्ञान, संगणक क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे. अशा अनेक क्षेत्रात भारतीय स्त्रीयांची प्रतिष्ठा उंचावण्यास भारतीय घटनेने मानवाधिकाराच्या अनुषंगाने केलेल्या तरतुदी व विविध विधिनियमांची परिणतीच होय. विविध कायद्याची अंमलबजावणी करून गुन्हेगाराला शिक्षा दिल्या आहेत, असे असले तरी स्त्री प्रतिष्ठेला बाधक ठरतील अशा अनेक बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. स्त्री-भ्रुण हत्येचा विचार करता आजही स्त्रीयांचे प्रमाण दर हजारी १०२० (National Family Health Survey-5,201-2021) आहे. दररोज गर्भजल परिक्षण करून अनेक स्त्री गर्भाला पोटातच अंत केला जात आहे.

शैक्षणिक प्रगतीचा आलेख महिला प्रतिष्ठेला उंच भरारी घेणारा असला तरी पुरूषांच्या तुलनेत महिलांचा १६.२५% कमी आहे (६४.६४%).

स्त्रीयांवरील विविध अत्याचारांची आकडेवारीवरून महिलासंबंधी अन्यायाची दिवसेंदिवस वाढ होत आहे. महिला व मुलींच्या मानवाधिकारावर आघात करणारे गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आहे. यामध्ये शारिरीक, बौध्दिक, मानसिक, आर्थिक गुन्ह्याचे प्रमाण फार मोठे आहे. जागतीक स्तराचा विचार करता प्रत्येक १० पैकी ०६ महिला लैंगिक, शारीरीक, गुन्ह्याला बळी पडतात. उन्न ने केलेल्या १० देशातील २४००० अभ्यासातील निष्कर्ष आहेत. शहरी भागातील १५ टक्के महिलांचा शरिरीक व लैंगीक छळ पतीकडून, जपान सारख्या प्रगत राष्ट्रात होते. २०१५ ते २०२१ पर्यंत स्त्रीयांवरील विविध अत्याचाराचे प्रमाण सतत वाढत आहे. यामध्ये (Conviction rate, 2017-19) Rape, Kidnapping Abduction, Dowry Deaths, Torture, Molestation, Sexual Harassment, Importation of Girls, Immoral Traffic Act, Indecent Represtation of Women (Preventation) Act, Dowry Prohibition Act या गुन्ह्याच्या अंतर्गत नमुद गुन्ह्याचे एकूण घटना अनुक्रमे २०१९, ६३.२, २३.७, ३५.६,१४.६, २१.१,३८.५, २३.७ असे आहे. याचाच अर्थ स्त्रीयांवरील गुन्ह्याचे प्रमाण सतत वाढत असून याची वाढ Per-

centage Variation 61% आहे (NCRB) २०२१ च्या अहवालानुसार राज्यसभेत मा. जितेंद्रसिंग मंत्री State for human affairs यांनी सांगीतल्यानुसार West Bengal's गुन्ह्याच्या बाबतीत सर्वोच्च आहे. येथे एका वर्षा स्त्रीयांवरील अत्याचाराची नोंद २९१३३ आहे. आंध्र प्रदेश-२८२४६, उत्तर प्रदेश-22639 (NCRB). IAC Crime Committee नुसार स्त्रीयांवरील गुन्ह्याचे प्रमाण मागील पाच वर्षात ८.८% वरून ९.४% पर्यंत (२००७-२०११) वाढले. Age group wise victims of Incest (Rape) cases during 2009. 10 वर्षापर्यंत एकूण २४, १० ते १४-३१, १४ ते १८-७६, १८ ते ३०-१५८, ३० ते ५०-३१, ५० वर्षापेक्षा जास्त-२, एकूण -३२२. Age groupwise victims of other (Rape) cases during 2009. 10 वर्षापर्यंत-६८६, १० ते १४ वर्षापर्यंत-१७२९, १४ ते १८ वर्षापर्यंत-२८३६, १८ ते ३० वर्षापर्यंत-१२६५४, ३० ते ५० वर्षावरील-३०९३, ५० वर्षापेक्षा जास्त ९३, एकूण-२१०९१, पाकीस्तानात मलालावर झालेल्या अन्याय अगदी बोलका आहे. अशा प्रकारे स्त्रीयांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहे.

**निष्कर्षः**

भारतीय शासनाने स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला जपण्याकरीता केलेल्या कायद्यामुळे० स्त्रीयांची प्रतिष्ठा उंचावली आहे. विधवा पूर्नविवाह कायद्यामुळे त्यांना विवाहीत महिलांचे सर्वाधिकारी प्राप्त झाले. बाल विधवांचे प्रमाण कमी झाले महिलांना संपत्तीचा अधिकार मिळाला, घटस्फोटाचा अधिकार पुरूषांच्या बरोबरीने मिळाला. विवाहाबाबत कायदेशीर संरक्षण मिळाले, स्त्रिपुरूष समानतेला भक्कम आधार मिळाला. आर्थिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. सर्व शिक्षा अभियानामुळे मुलीच्या शिक्षणातील ड्राप रेट कमी झाला. साक्षर भारती मिशनमुळे स्त्रीयांचा literacy rates वाढला. The results of this is that India has world's largest number of professionally women. In fact that, India has the largest population of working women in the world and has more number of Doctor, Surgeon, Scientists, Professor, Advocate than the United States. यावरून भारतीय स्त्रीयांच्या प्रतिष्ठेचा आलेख चढला आहे, हे निश्चित आहे.

**शिफारशीः**

१) स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोनात असून सकारात्मक बदल होणे आवश्यक आहे.

२) महिला संरक्षण विषयक कायद्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने करण्याची गरज आहे.

३) जनसामान्यांमध्ये मानवाधिकाराबाबत जनजागृती आवश्यक आहे.

४) गुन्हेगाराला योग्य दंड करणे आवश्यक आहे.

**तळटीपाः**

१) Gouba, O.P. An Introduction to Political Theory, Macmillan Publishers India Ltd. Delhi, 2009, P. No.319

२) खडसे-बोर्डे सुनिता, खडसे संतोष केशव, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन, पुणे २०२०, पान क्र.१७ ते २३.

**संदर्भ ग्रंथः**


१) Gouba, O.P. An Introduction to Political Theory, Macmillan Publishers India Ltd. Delhi, 2009,

२) खडसे-बोर्डे सुनिता, खडसे संतोष केशव, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन, पुणे

३) घांगरेकर चिंतामण गणेश, भारतीय राज्यघटना (स्वरूप आणि राजकारण) श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, १९९३

४) गव्हाणे-गोटे डॉ. शुभांगी, महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन औरंगाबाद, २००४

५) शर्मा श्रीमती पुजा, महिलाऐं एवं मानवाधिकार, साग पब्लिशर्स, जयपुर, २०१२

६) सिंह बी.एन, सिंह जनमेजय, आधुनिकत्व एवं महिला सशक्तीकत्व, रावल पब्लिकेशन, नई दिल्ली-२०१०

७) Report of the committee on crime statistics , Crime against women (Social Statistics Division Central Statistics Office Ministry of Statistics and Programme Implementation, New Delhi)

८) Crime in India, 2009, NCRB, Ministry of Home Affairs


❑❑❑